परिचय

# कर्तृत्ववान व्यक्तिमत्वाची ओळख - डॉ. मकरंद श्रीनिवास जावडेकर

कोल्हापूरच्या मातीने अनेक कर्तृत्ववान, बुद्धिमान, समाजधुरीण अशी नररत्ने जन्माला घातली आहेत. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी आपल्या गावाचे आणि पर्यायाने आपल्या देशाचेही नाव उज्वल केले आहे. त्यापैकीच एका बुद्धिवान व कर्तृत्ववान व्यक्तिमत्वाची ओळख इथे करून देत आहे. कारण ते आपले ज्ञातिबांधव आहेत. त्यांचे नांव आहे- डॉ. मकरंद श्रीनिवास जावडेकर.

त्यांचे मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण कोल्हापूर मध्ये झाले. पुढे कराड येथील फार्मसी कॉलेजमधून त्यांनी B.Pharm. ही पदवी प्राप्त केली. त्यानंतर मुंबई येथे UDCT मध्ये M.Pharm डिग्रीसाठी त्यांनी प्रवेश घेतला. इथून पुढे मात्र त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. त्यांच्या अभ्यासू आणि मेहनती वृत्तीला कायमच यशाने साथ केली. पोस्ट ग्रॅज्युएशन झाल्यावर मुंबईत एका नामवंत औषधाच्या कंपनीत नोकरी करत असतानाच, अमेरीकेतील मिनीसोटा युनिव्हर्सिटीत त्यांना डॉक्टरेट करण्याची संधी मिळाली. या विद्यापीठाची डॉक्टरेट प्राप्त होताच ग्रोटोन इथे फायझर या जगप्रसिद्ध औषध कंपनीमध्ये R & D या डिपार्टमेंट मध्ये ते रुजु झाले.

अल्पावधीतच आपल्या कर्तृत्त्वाच्या बळावर याच डिपार्टमेंटच्या डायरेक्टर पदावर त्यांनी झेप घेतली. आपल्या ज्ञानाच्या आणि कल्पकतेच्या सहाय्याने जागतिक बाजारपेठेत कंपनीला सतत प्रगतीपथावर ठेवले. या दरम्यान आपल्या वैयक्तिक कामगिरीचा आलेख सतत उंचावत ठेवल्यामुळे त्यांना अनेक मानसन्मान प्राप्त होत गेले. फायझरमध्ये सतत २८ वर्षांच्या सेवेमध्ये क्लिनीकल ट्रायल्स, उत्पादन व त्यांचे पॅकेजिंग, नवीन टेक्नॉलॉजी, इतर कंपन्या बरोबर व्यवसाय, व्यापारवृद्धी अशा अनेक क्षेत्रात भरीव कामगिरी केली. सन २००१ मध्ये इंडियन फार्मास्युटीकल काँग्रेसने M. L. Khurana Memorial Lecture of the year Award ने सन्मानित केले. २००२ मध्ये डॉ. अब्दुल कलाम यांनी Global Leadership Summit साठी सन्माननीय अतिथी म्हणून आमंत्रित केले होते. तसेच



२००६ मध्ये जॉर्ज बुश यांच्याबरोबर व्यापार शिष्टमंडळातून सदस्य म्हणून भारत भेट झाली. फायझरचे एशिया CRG उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. २०११ मधे डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटीने त्यांना डॉक्टरेट पदवी दिली. संपूर्ण जगातून उत्कृष्ट औषध कंपनी निवड करण्यासाठी जी समिती असते, त्या पॅनेलवर जगातून ७ जज्जेस नियुक्त केले जातात. त्यापैकी एक असण्याचा बहुमान डॉ. जावडेकर यांना मिळाला आहे.

सध्या ते Pharmaceutical Technology Europe या दरमहा प्रसिद्ध होणाऱ्या प्रकाशनांच्या संपादकीय सल्लागार समितीचे सदस्य आहेत. आता निवृत्तीनंतर अमेरिका, युरोप, आशियातील अनेक कंपन्यांचे सल्लागार आहेत. यानिमित्ताने त्यांची जगभर भ्रमंती चालू असते.

एकीकडे आपल्या सेवेमध्ये उत्तुंग यश प्राप्त करताना, त्यांनी स्वतःमधील क्रीडा कौशल्यही कसोशीने जपले आहे. लॉन टेनिस या खेळात नैपुण्य मिळवून अनेक टेनिस क्लब आणि औषधी कंपन्यांच्या स्पर्धेत विजेतेपदाचा मान मिळवला आहे. काही अमेरिकन खेळाडूसह हर्ष मांकड, रमेश कृष्णन, महेश भूपती या टेनिसपटूसह त्यांना खेळायची संधी मिळाली आहे. टेबल टेनिसही उत्तम प्रकारे खेळू शकतात. पत्ते खेळायला बसले की, झब्बूपासून ते बदाम सात, जजमेंट, कॅनस्ट्रॉ, मेंढीकोट या डावामध्ये ते आपले आपल्यालाही भारी पडतात. क्रीडाक्षेत्राबरोबरच हिंदी-मराठी सिनेसृष्टीतही त्यांना खूप रुची आहे. आमीरखान व त्यांचे कुटूंबिय, सलमान खान, आशुतोष गोवारीकर अशा प्रसिद्ध कलावंताशी त्यांचा व्यक्तिगत परिचय आहे. कै. देवानंदजींनी न्यूयॉर्क मध्ये त्यांच्या आत्मचरित्राच्या प्रकाशनाच्या



प्रसंगी त्यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित केले होते.

अशा या अभिरुचीसंपन्न व्यक्तिमत्त्वाला पत्नी म्हणून सौ. मेलीडा यांचीही समर्पक साथ मिळाली आहे. मूळ अमेरिकन असूनही त्यांनी भारतीय संस्कृतीही आत्मसात केली आहे आणि त्यांची मुले म्हणजे भारतीय-अमेरिकन संस्कृतीचा सुंदर मिलाफ आहे. आजही अमेरिकेतील ४० वर्षांचा वास्तव्यानंतरही आम्हाला ते इथलेच आणि आपलेच वाटतात. त्यांच्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा आणि पुढील आयुष्यासाठी अनेक शुभेच्छा.

– सुधीर करंबेळकर, सातारा